# एमएमआरसीएल होणार मालामाल

## मेट्रो-३ स्थानकांच्या नावांतून २०० कोटींचा महसूल

▶**मुंबई ।** मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एमएमआरसीएल) मेट्रो-३ मार्गावरील ५ स्थानकांच्या नामकरणाचे अधिकार विविध नामांकित कंपन्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे महापालिकेला 'नॉन-फेअर बॉक्स रेव्हेन्यू'च्या माध्यमातून वार्षिक ४० कोटी रुपयांचा महसूल मिळणार आहे. मेट्रो-३ सुरू झाल्यानंतर पुढील ५ वर्षांत 'नाम' प्राधिकरणाद्वारे ५% वाढीसह एकूण २१६ कोटी रुपये महापालिकेला मिळणार आहेत.

या अंतर्गत कोटक महिंद्रा बँकेला वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) स्थानक आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो स्थानकाचे अधिकार देण्यात आले आहेत, तर आयसीआयसीआय लोम्बार्डला सिद्धिविनायक मेट्रो स्थानक आणि आयुर्विमा महामंडळचे (एलआयसी) अधिकार देण्यात आले. चर्चगेट आणि हुतात्मा चौक मेट्रोचे अधिकार, स्थानकांना नावे ठेवण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. या अंतर्गत अशा कंपन्यांना ब्रँडिंगसाठी जागा मिळेल आणि या कंपन्यांची नावे गाड्यांच्या घोषणा आणि स्थानकाच्या नकाशांमध्ये नमूद केली जातील. तसेच संबंधित स्थानकाच्या नावापुढे त्या कंपन्यांचे नाव जोडले जाणार आहे.

### जगातील सर्वाधिक कमाई करणारी मेट्रो-३ची स्थानके



हे नॉन फेअर बॉक्स महसूल निर्माण करण्यासाठी, निधी सुलभ करण्यासाठी आणि तिकीट शुल्क वाजवी ठेवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. मेट्रो-३ स्थानकांवरून प्रति स्थानक वार्षिक सरासरी ८ कोटी रुपये उत्पन्न मिळेल. ही किंमत भारतातील सर्वात जास्त आहे आणि आतापर्यंत जगातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या मेट्रो स्थानकांपैकी एक आहे. दुबई, माद्रिद, जकार्ता, क्वालालंपूर मेट्रो स्टेशन्सची सरासरी वार्षिक कमाई प्रति स्थानक १० लाख इतकी आहे.

– **अश्विनी भिडे**, व्यवस्थापकीय संचालक, एमएमआसीएल